
# देशोदेशींचे

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ... [illegible]
दा. क्र. 30795



BVBK-0403014

पुस्तक चौथें

ठिगळे बंधू

प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरितां लिहिलेलें

# देशोदेशींचे प्राणी

## पुस्तक चौथें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
[illegible]नीं देणगी दिलेले पुस्तक.

लेखक

**वि. मा. ठिगळे**, बी. ए., बी. टी.
शिक्षक, अहमदनगर एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, अहमदनगर.

व

**रा. मा. ठिगळे**
मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा, राहुरी.

पहिली आवृत्ति १९४७

BVBK-0403014

किंमत [illegible] आणे १ [illegible]

# आमचें प्रकाशन

शिक्षण-क्षेत्रांत अनुभवलेले आमचे बंधु श्री. श्री. मा. ठिगळे, एम्. ए, एल्एल्. बी., बी. टी. यांच्या खास देखरेखीखालीं तयार झालेलीं पुस्तकें.

१ पक्ष्यांची ओळख भाग १ (इयत्ता १ करितां)
२ ,, ,, भाग २ (इयत्ता २ करितां)
३ ,, ,, भाग ३ (इयत्ता ३ करितां)
४ ,, ,, भाग ४ (इयत्ता ४ करितां)
५ पाळीव प्राणी (इयत्ता १ करितां)
६ जंगली प्राणी (इयत्ता २ करितां)
७ विषारी प्राणी (इयत्ता ३ करितां)
८ देशोदेशींचे प्राणी (इयत्ता ४ करितां)
९ लोकगीतें-संग्रह (आबालवृद्धांकरितां)

---

पत्ता— मेसर्स जोशी आणि लोखंडे
३३५ शनवार पेठ, पुणें २.

Printed by P. B. Kale at Pratibha Press, 335 Shanwar, Poona 2
Published by D. S. Joshi and D. B. Lokhande, Proprietors
Messrs Joshi and Lokhande, Poona 2.

# लेखकाचे दोन शब्द

•••○○○•••

प्राथमिक शाळांच्या नवीन अभ्यासक्रमास अनुसरून बालवाङ्मय निर्माण करण्याचे हेतूनें आम्हीं इ. १ ते ४ करितां 'पाळीव प्राणी,' 'जंगली प्राणी', 'विषारी प्राणी', 'देशोदेशींचे प्राणी' हीं पुस्तकें लिहिलीं असून हें पुस्तक त्यांतीलच एक आहे. नवीन अभ्यासक्रमांत सामान्यज्ञान, वाक्यरचना वगैरे नवीन विषयांचा समावेश केलेला आहे हे सर्व विषय या पुस्तकांत मुलांच्या सहजप्रवृत्ति लक्षांत घेऊन हाताळलेले आहेत.

मुलें अगदीं लहानपणापासून प्राणी पाहातात, त्यांच्या गोष्टी ऐकतात, पुष्कळसे प्राणी त्यांना आवडतात देखील; पण त्यांचा स्वभावविशेष, शरीरविशेष, व जीवनक्रम त्यांना माहीत नसतो. ही माहिती त्यांना कोणी पुरवीतहि नाहीं. सबब ही सर्व माहिती सामान्यज्ञानाचे दृष्टीनें येथें दिली आहे. ही माहिती देतांना मुलांची निरीक्षण-शक्ति, स्मरण-शक्ति, कल्पना शक्ति व विचार शक्ति वाढविण्याची खबरदारी घेतली आहे.

वाक्यरचनेच्या दृष्टीनें मुलांना कोणत्याहि प्राण्याविषयीं माहिती लिहीण्यास सांगितल्यास तीं ठराविक वाक्यें लिहितात. उदाहरणार्थ, कुत्र्याविषयीं माहिती विचारल्यास 'कुत्र्याला चार पाय असतात, दोन डोळे असतात, दोन कान असतात, एक शेपूट असतें, तो वरणभात खातो.' वगैरे ठराविक साच्याचीं वाक्यें तीं लिहितात. वास्तविक कोणताहि चतुष्पाद प्राणी घेतला तर त्याला वरील वर्णन लागू पडेल. एखादा अपवाद सोडल्यास प्राण्यांना सामान्यतः चारच पाय असतात, दोनच डोळे असतात, एकच शेपूट असतें. पृथ्वीतलावर तिसरा डोळा शंकराशिवाय दुसऱ्या कोणाला हि नाहीं. आणि ता उघडतो तोहि कधींकाळीं रागावल्यावर. एवढा मोठा हनुमान, पण त्याला शेपूट एकच. तें लांब असेल कदाचित्, पण होतें एकच. सारांश अशा ठराविक साच्याच्या वाक्यरचनेमुळें प्राण्यांचें खरेंखुरें ज्ञान मुलांना होत नाहीं. प्राण्यांतील विशेष शोधून काढून ते वाक्यरचनेंत गोवण्याची दृष्टि मुलांना आली पाहिजे. कुत्र्याविषयींचेच विशेष लिहावयाचे झाल्यास

'कुत्र्याचें शेपूट वांकडें असतें, त्याला हाड चघळणें आवडतें, तो इमानी असतो वगैरे' अशीं सुंदर वाक्यें लिहितां येतील. वाक्यरचनेची ही विशेष दृष्टी या पुस्तकाचे वाचनानें मुलांना सहज येईल, असा भरंवसा आहे.

नवीन अभ्यासक्रमांतील निरनिराळ्या विषयांच्या सांच्यांत ही प्राण्यांची माहिती बसवितांना पुस्तक रुक्ष व कंटाळवाणें होऊं नये म्हणून आत्म-कथन, चित्रवाचन, नाटयछटा, संवाद या व अशा भाषेच्या निरनिराळ्या अंगांचा व उपांगांचा भरपूर उपयोग केला आहे. त्यांमुळें पुस्तक चटकदार व मनोरंजक झालें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे नवीन अभ्यासक्रम व बालवाङ्मय यांचा सुंदर मिलाफ या पुस्तकांत झाला असून तें पुरवणी वाचनास अतिशय उपयुक्त ठरेल, असें आम्हांस वाटतें. पुरवणी वाचन म्हणून जास्तींतजास्त मुलांच्या हातांत हें पुस्तक जाऊन आम्हांस बालसेवा घडो एवढीच आमची इच्छा.

लेखक

---

# अनुक्रमणिका


| धड्याचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| १ साळिंदर | १ |
| २ याक | ४ |
| ३ मॅमाथ | ६ |
| ४ कांगरू | ९ |
| ५ लामा व अल्पाका | १२ |
| ६ मी कोण ? | १५ |
| ७ झेब्रा | १८ |
| ८ गेंडा | २० |
| ९ पाणघोडा | २२ |
| १० कस्तुरीमृग | २४ |
| ११ मी कोण ? | २७ |


# देशोदेशींचे प्राणी

इयत्ता ४ थी

[library stamp]

## १ साळिंदर (सहल)

साळिंदर हा प्राणी तुमच्या पाहाण्यांत नसणार. कारण तो आपल्या हिंदुस्थानांत फार क्वचित् आढळतो. आढळलाच तर तो सह्याद्रीच्या एकाद्या गुहेंत किंवा हिमालयाच्या गुहेंत. बाकी इतर ठिकाणीं तो औषधाला मिळणार नाहीं. त्याच्या वस्तीचीं मुख्य ठिकाणें म्हणजे दक्षिण युरोप व उत्तर आफ्रिका. या देशांत त्याला ‘ हिस्ट्रिक्स क्रिस्टाटा ’ असें म्हणतात.



साळिंदर कसा असेल बरें ? पाहावयाचा आहे कां तो तुम्हांला ? चला तर मग माझ्याबरोबर. बरोबर टॉर्च असूं द्या. कारण आपणांस

अतिशय काळोख्या गुहेंत जावें लागणार. आणखी भाला, बंदूक वगैरे हत्यारेंहि घ्या. तशीं तेथें कांहीं भिती नसते म्हणा. पण काळवेळ कांहीं सांगून येत नाहीं. पुन्हां पश्चात्तापाची पाळी नको.

हीच ती गुहा. या गुहेंत सांळिंदराची वस्ती असते. असें आमळचे खेडूत सांगतात. सांगावांगी कशाला; आतां प्रत्यक्षच पाहूं या. सावध; शिरा आंत. हल्कें हल्कें चला. अद्याप पुष्कळ दिसत आहे. कां? थकलांत कां? आतां दिसेनासें झालें म्हणून, कीं भिती वाटते म्हणून? तसें भिण्याचें कांहीं कारण नाहीं. वाघ, सिंह वगैरे हिंस्र पशू येथें तुम्हांस चुकून सांपडणार नाहींत. कारण हे बलिष्ठ प्राणीसुद्धां भितात बिटुकल्या सांळिंदराला. ते कां भितात तें कळेल तुम्हांला अनुभवानेंच.

अरे बापरे! किती लांबलचक गुहा ही! किती चालावें तरी संपत नाहींच. वास किती उबट! उभे राहावत नाहीं अगदीं. पुढें तर कांहींच दिसत नाहीं. आतां टॉर्च लावलाच पाहिजे. हा पाहा पडला टॉर्चचा प्रकाश. अद्याप कांहीं स्वारी कुठें दिसत नाहीं. सांपडते कीं नाहीं देव जाणें, चला पुढें जरा. प्रयत्न करून पाहूं. असेल तुमची उत्कट इच्छा तर दिसेल साळिंदर.

गुपचूप, एकदम गुपचूप. तो पाहा साळिंदर. या इकडे उजव्या हाताच्या डग्रीला लहनशा कोनाडयासारखें दिसतें आहे ना? त्यांत तो झोंपला आहे. घ्या पाहून डोळे भरून तो उठण्याचे पूर्वीं. तसा कांहीं तो शरिरानें मोठा नाहीं. असेल दोन अडीच फूट लांब जास्तींत जास्त. रंग कसा पण पांढरा शुभ्र आहे! अगदीं ससासारखा. कांहीं साळिंदर काळेहि असतात. त्याचें तोंड लांबट व चिंचोळें आहे. पोटावर ती कातडी घडी दिसते ना? त्या घडींतच तो आपलीं अंडीं ठेवतो. तेथेंच तीं अंडीं फुटून पिलें बाहेर पडतात. सुमारें एक महिनाभर पिलें पिशवींतच राहातात. यावेळीं पिशवींतील दुधाच्या शिरा मोकळ्या होतात. त्यांतून पिलें दूध शोषून घेतात.

चाहूल लागली वाटते आपली त्याला. ती पाहा त्यानें जांभई दिली. दात पण किती सुंदर दिसले त्याचे. जांभई देतांना तोंड वासलें त्यानें तेव्हां! पण त्याला सुळे नाहींत वाटतें. मग अजबच प्राणी दिसतोय! कारण बहुतेक प्राण्यांना सुळे असतात. हत्तीला सुळे आहेत. मनुष्याला आहेत. कुत्र्यालासुद्धां आहेत, सुळे असणोर प्राणी बहुतेक मांसाहारी असतात. साळिंदराला सुळे नसले तरी त्याच्या दोन्ही जबड्यांतील पुढचे दांत मात्र खूप मजबूत असतात, कुरतडून खाण्याचे कामीं त्याला या दांतांचा चांगलाच उपयोग होतो.

असो, पण हे आपल्या बाजूला काय पडूं लागले आहे? हीं तर त्याचीं पिसें. किती अणुकुचिदार आहेत हीं! सुंदर पण आहेत. अरे बाबांनो, त्याच्या पिसांच्या सौंदर्याला भुलून पुढें जाऊं नका. नाहींतर डोळाबिळा फोडून घ्याल. जरा मागें व्हा आणि पिसें आलीं तर टोप्या आडव्या धरा. म्हणजे टोप्यांत तीं घुसतील आणि तुमचेंहि संरक्षण होईल. स्वत:चें संरक्षण करण्याकरितां तो आपल्या अंगावरील पिसें तुमच्याकडे फिरकावीत आहे. वाघ काय किंवा सिंह काय या पिसानांच फार भितात. डोळ्यांत गेलीं तर घ्या काय? म्हणून एवढी मोठी साळिंद-राची गुहा असली तरी ते येथें फिरकायचेसुद्धां नाहींत. चला परतूं या आतां. जसा पिसांचा पाऊस पडायला लागलाय. उगाच दुखापत होईल कोणाला. नका; भाल्यानें त्याला टोचूं नका किंवा बंदूकहि झाडूं नका. धाऱ्यावर हीं हत्यारें त्याचेकरितां नव्हतीं कांहीं सांगितलीं बरोबर घ्यायला. चुकून आपण वाघाच्या नाहींतर सिंहाच्या गुहेंत शिरलों आणि प्रसंग पडलाच तर वापरतां यावी एवढाच हेतु होता. आतां तुम्हांला साळिंदराला तुमच्या पोटांतच जागा द्यावयाची असल्यास माझी कांहीं ना नाहीं. पण नकोच तें मला आतां.

पडा बाहेर या प्रकाशांत. घ्या ताजी व शुद्ध हवा. किती जीव गुदमरला होता आंत! पण बरें झालें. हेतु सफळ झाला. साळिंदर

बघण्यास मिळाला. त्याच्या हत्याराचा प्रयोगहि आपणांवर झाला. किती तीक्ष्ण आणि लांब पिसें ! सर्व जातींच्या साळिंदरांचीं पिसें कांहीं सारखीं लांब नसतात. पण अमेरिकेमध्यें साळिंदरांची एक जात आहे. त्यांचीं पिसें आंखूड असतात. तीं पिसें तेथील रहिवाशी, जे रेड इंडियन्स, ते आपल्या कपड्यावर शोभेकरितां लावतात. हे कपडे काळवीट, हरीण, रेनडिअर, ससा या प्राण्यांच्या कातडीचे केलेले असतात. अरे, पण हें काय ? मी असा वाहवत काय चाललों आहे ? विषयांतर झालें. पण त्यांतहि कांहीं बिघडलें नाहीं. जातां जातां तुम्हांला साळिंदराच्या पिसांचा मनुष्यानें केलेला उपयोगहि कळला. चला, काळोख पडूं लागला. लवकर घर गांठणें बरें.

प्रश्न—१. साळिंदर प्राणी कोणत्या देशांत आढळतो ?
२. साळिंदराचें वर्णन करून त्याच्या शरीररचनेंतील विशेष सांगा.
३. साळिंदराच्या पिसांचा त्याला उपयोग काय ?
त्यांचा रेड इंडियनास उपयोग काय ?


---

## २ याक ( माहिती )

हिंदुस्थानचे उत्तरेस तिबेट नांवाचा प्रांत आहे. हा प्रांत तिबेटचें पठार म्हणून प्रसिद्ध आहे. या मुलखांत बुद्ध धर्मीय लोकांची वस्ती बरीच आहे. तिबेटच्या पठारावर व त्याच्या जवळपास बऱ्याच निरनिराळ्या वनस्पति व प्राणी आढळतात. त्यांपैकीं विशेष म्हणजे याक प्राणी होय. हा प्राणी आपल्या हिंदुस्थानांत नाहीं.

याक म्हणजे एक अतिशय मोठें धूडचें धूड असतें. तो अतिशय गलेलठ्ठ असतो. त्याचे पाय आखूड असतात. नराची उंची पांच सहा फूट

असते. मादी नराहून बुटकी असते. म्हणजे आपल्या इकडील सोरटी गाईबैलांपेक्षांहि याक जोडपें उंच व धिप्पाड असतें.



दिसावयास याक जरा ओंगळ दिसतो. कारण त्याच्या खांद्यावरून, पोटावरून, मांडीवरून लांब लांब केस लोंबत असतात. हे केस फार राठ असतात. आपल्या इकडील घोड्याच्या केसांपेक्षांहि त्याचे केस राठ असतात. या केसांची गुंतागुंत होऊन ते एकमेकांत गुरफटले म्हणजे ते एखाद्या साधूच्या जटाप्रमाणें दिसतात. लांब केसांमुळें त्याचें शेपूट मात्र झुपकेदार व भारदस्त दिसतें आणि त्याच्या शरीरास तें शोभूनहि दिसतें.

याक प्राण्याचें खाणें अगदीं साधें असतें. गवत हें याचें मुख्य खाणें. पठारावर मुबलक गवत उगवतें. हें गवत खाऊन याक धष्टपुष्ट होतो. झाडपालाहि तो खातो.

याक हा फार कष्टाळू आहे. आपल्या इकडील बैलाप्रमाणें त्याचा उपयोग करतात. ओझीं वहाण्याकरितां तर त्याचा फार मोठा उपयोग होतो. त्याच्या केसाच्या निरनिराळ्या वस्तु करतात.

मादी मनुष्याला दूध देते. आपण जसें गाईचें दूध मिटक्या मारीत खातों, तसें तिबेटांत लोक मादीचें दूध खातात. या दुधापासून ते दहीं, खवा, वगैरे सारखे पदार्थ तयार करतात, याक प्राण्यांचें मांसहि माणसें खातात. त्याच्या शेपटीच्या चवऱ्या व गंगावनें करतात.

प्रश्न—१. याक कोणत्या देशांत आहेत ? ते काय खातात ?
२. याकचें वर्णन करा. त्याचा उपयोग काय ?


---

# ३ मॅमथ

" मेल्याचा निर्वंश होईल, कुळींत दिवा लावायला कोणी उरणार नाहीं. " असें एकाद्या म्हातारीचें शिव्याशाप तुम्हीं ऐकले असतील. निर्वंश होणें म्हणजे त्या घरांतील सर्व माणसें मरून वंश खुंटणें. पेश-व्यांचा निर्वंश झालेला तुम्हीं इतिहासांत वाचलेलेंच असेल. अशा प्रकारें घराण्याचा निर्वंश झालेलीं पुष्कळ उदाहरणें सांपडूं शकतील. पण सबंध एका जातीचा, जमातीचा निर्वंश झालेलें उदाहरण माणसाच्या इतिहा-सांत आढळत नाहीं.

पृथ्वीचे पाठीवर इतके असंख्य प्राणी आजपर्यंत जन्मास आले असतील आणि गेले असतील. आणखीहि अगणित प्राणी जन्मास येतील आणि जातील. त्या सर्वांची नोंद ठेवून त्यांचा इतिहास उपलब्ध करणें शक्य झालें नाहीं आणि होणार नाहीं. पण त्या त्या प्राण्याच्या जातीचा, जमातीचा इतिहास तयार करणें शक्य आहे. आजपर्यंत उप-लब्ध असलेल्या प्राण्यांच्या इतिहासावरूनहि असें स्पष्ट दिसतें कीं, प्राण्यांची सबंध जातच्या जात नाहींशी झाल्याचीं उदाहरणें फारशीं नाहींत. अशा थोडया उदाहरणांपैकीं एक उदाहरणें म्हणजे मॅमथचें. मॅमथ ही एक सध्यां अस्तित्वांत नसलेली हत्तीची जात आहे.

मॅमथ जातीचा हत्ती आज जगांत असणाऱ्या हत्तींपेक्षां किती तरी मोठा आणि आडदांड होता. पण त्याचा आज मागमूसहि नाहीं. त्याला केव्हांच मूठमाती मिळाली. काळाच्या उदरांत कित्येक गोष्टी गडप होतात, असें म्हणतात तें खोटें नाहीं. कालचक्रांत सांपडलेलीं मोठमोठीं राज्यें नाश पावलीं आहेत. महान् साम्राज्यें धुळीस मिळालीं आहेत. मग मॅमथची काय कथा ! असो.



मॅमथचा वंश कोठें होता ? केव्हां होता ? असे कित्येक प्रश्न तुमच्या मनांत उभे राहिले असतील. त्यांचाच आपण येथें विचार करूं.

मॅमथची वस्ती उत्तर ध्रुवावर होती. लाखों वर्षांपूर्वीं जेव्हां उत्तर ध्रुवावर बाराहि महिने बर्फाशिवाय कांहींच नव्हतें, तेव्हां मॅमथ तेथें राहत असे. या कडकडीत थंडीच्या प्रदेशांत त्याचें जीवन किती कष्टमय असेल, याची कल्पनाच केलेली बरी. पण हें कष्टमय जीवन कंठण्याची तरतूद परमेश्वरानें करून ठेविली होती, असें मॅमथच्या शरीररचनेवरून दिसतें. तो शरीरानें नुसताच अक्राळविक्राळ नव्हता, तर त्याच्या सर्व

अंगावर बारीक केसांच्या लवीचा झगा होता. या लवीमुळें त्याची थंडी जाणार नाहीं म्हणूनच कीं काय त्यावर आणखी लांब लांब केसांचा कोट होता. यामुळें त्याला थंडी कशी ती वाजतच नसे.

मॅमथचे सुळे फारच लांब असून अतिशय टोंकदार होते. ते वरचे बाजूला कललेले होते. आपल्या पाहाण्यांत येणाऱ्या हत्तींचे सुळे वर कललेले नसून, ते खालीं कललेले असतात. तसेंच मॅमथचे वर कललेल्या दोन सुळ्यांचीं टोकें दोन बाजूस असत. एवढेंच त्याचें विशेष. बाकी सर्व अवयव सध्यांचे हत्तीच्या अवयवांप्रमाणेंच असत.

वरील माहिती वाचून तुम्ही कदाचित् असें म्हणाल कीं, मॅमथ जात नाहींशीं होऊन आज लाखों वर्षें झालीं. मग त्याचें एवढें हुबेहूब वर्णन तुम्हं कशावरून करतां ? तुमचा प्रश्न योग्य आहे. आणि त्याचें उत्तरहि सोपें आहे. तुम्हांला माहिती आहे कीं, रानटी मनुष्याला चित्रें काढतां येत होतीं म्हणून. त्यानें मॅमथचीं चित्रें त्याच्याच सुळ्यावर काढून ठेविलीं आहेत. या चित्रावरून त्याच्या शरीररचनेची कल्पना सहज येते. तसेंच त्याच्या अक्राळविक्राळ स्वरूपाची कल्पना त्याच्या हातीं लागलेल्या मोठमोठ्या अगडबंब हाडांवरून होते. मांसानें माखलेलीं मॅमथचीं हाडें अद्यापहि सैबेरियाच्या बर्फांत सांपडतात. हीं हाडें जमा करून मोठमोठ्या प्राणीसंग्रहालयांमधून ठेवलेलीं आहेत. तसेंच त्यांची हस्तीदंतावर काढलेलीं चित्रेंपण तेथें आहेत. तुम्हांला एखादा मोठें प्राणिसंग्रहालय पाहाण्याची संधि आल्यास मॅमथला विसरूं नका.

प्रश्न—१. मॅमथ कोठचा? तो आतां कोठें पहावयास मिळेल ? कसा ?


२. मॅमथची माहिती कशावरून मिळते ?

३. हत्ती आणि मॅमथ यांची तुलना करा.

४. मॅमथच इंद्राचा ऐरावत होऊन तुमच्याशीं स्वर्गांतून बोलत आहे, अशी कल्पना केली तर तो तुम्हांला काय सांगेल ?

# ४ कांगरू ( आत्मकथन )

माझें नांव कांगरू. मी ऑस्ट्रेलिया देशाचा राहाणारा. माझे भाऊबंद ऑस्ट्रेलियाचे जवळपासच्या बेटांतहि राहातात. न्यूगिनीमध्येंहि माझ्या कांहीं सग्यासोयऱ्यांची वस्ती आहे.



माझ्या कांगरू जातीमध्यें पुष्कळ उपजाती आहेत. कांहीं कांगरू झाडावर राहातात. म्हणून त्याना ट्री कांगरू म्हणतात. कांहीं खडकावर राहातात, त्यांना रॉक कांगरू म्हणतात. जलद चालणाऱ्या कांगरूची एक जात आहे, ती ब्रश कांगरू म्हणून ओळखिली जाते. कांहीं कांगरूंना रॅट कांगरू म्हणतात. आमच्या कांगरुमध्येंसुद्धां अशा अठरापगड जाती आहेत.

आमच्या जाती कितीहि असल्या तरी, आमच्या शरीररचनेमध्यें किंवा खाण्यापिण्यामध्यें विशेष फरक नाहीं. माझ्या सारखेच सर्व जातींचे कांगरू दिसायला आहेत. मी काळाहि नाहीं आणि गोराहि नाहीं. माझा रंग करडा आहे.

तुमच्या हेंहि लक्षांत आलें असेल कीं, माझ्या शरीराचे मानानें माझें डोकें लहान आहे. पण मला वाटतें कीं, तुमचें डोकें देखील तुमच्या शरीराच्या मानानें लहान आहे. माझे कान पाहून मात्र तुम्हांला हत्तीची आठवण झाली असेल. कारण माझे कान मोठे आहेत. माझे मागचे पायहि खूप लांब असून, मागील भाग मांसल आहे. माझ्या पुढील पायांना पांच व मागील पायांना चार बोटें आहेत. माझें शेपूट लांब व बळकट आहे. त्यामुळें मी मागील दोन पाय व शेपूट यांची तिवई करून बसतों. तुमची उंची पांच फूट आहे तर माझी लांबी पांच फूट आहे. तुमची उंची एवढी असून तुम्हांला उडी मात्र माझ्या इतकी लांब मारतां येत नाहीं. तुम्हांला आश्चर्य वाटेल ऐकायला कीं, मी तीस फूट लांब उडी मारूं शकतों. तुम्ही सात जन्म घेतले तरी माझ्याइतकी लांब उडी मारतां येणार नाहीं तुम्हांला.

तुम्हांला माझें शरीर दिसावयास विचित्र दिसत असेल. पण तो दोष माझा नाहीं. तुमच्या दृष्टीचा आहे. माझा तुमच्याशीं यापूर्वींच परिचय झाला असता तर तुम्हांला माझ्यांत कांहींच विचित्र वाटलें नसतें. पण परिचय होणार कसा ! तुमच्या देशांत मला कोणी पाहुणे म्हणून अद्याप बोलाविलें नाहीं. ये-जा झाल्याशिवाय ओळख होत नाहीं. तुमच्या हिंदुस्थानांतील कित्येक प्राण्यांविषयीं आस्ट्रेलियन लोकांना अचंबा वाटतो त्याचें कारण हेंच. तुम्हांला कदाचित् हें कारण खरें वाटणार नाहीं. तुम्ही म्हणाल कीं, आपला विचित्रपणा लपविण्याकरितां हा कांगारू गप्पा मारतोय म्हणून, पण मी स्पष्ट सांगतों कीं, हा लपवाछपवीचा खेळ मला माहीत नाहीं. मी खराच विचित्र असेन तर मला वाटतें तें देवाच्या दयेमुळें. म्हणच आहे, देवाची करणी अन् नारळांत पाणी.

माझ्या मादीच्या शरीरांत मात्र विचित्रपणा आहे खरा. तिच्या शरीराला एक पिशवी असते. या पिशवींत ती आपलें मूल ठेवतें. एस्किमोबाई आपले पिशवींत स्वतांचें मूल निजविते. तें तुम्हांला माहीत आहे ना ?

त्याचप्रमाणें माझ्या मादीचें. फरक एवढाच कीं, एस्किमोबाईची झूल कातड्याची असते आणि माझ्या मादीची पिशवी म्हणजे तिच्या शरीराचा एक भागच असतो. या पिशवींतच माझीं पिलें त्यांचे आईला पितात. माझ्या मादीला एकेवेळीं एकच मूल होतें. ती आपल्या मुलास फार जपते. तें मोठे होऊन जगांत स्वत:चे पायावर उभे राहण्यास शिकेपर्यंत ती त्याचा सांभाळ करते. तुमच्या आयाबहिणी आपल्या कच्च्या बच्च्यांचा सांभाळ अशाच करतात ना ?

आम्ही एकटे दुकटे राहात नाहीं. तुम्ही जसे एकत्रित कुटुंबांत राहातां तसेच आम्ही कळप करून राहातों. खाण्याकरितां मात्र जो तो स्वतंत्रपणें धडपड करतो. तुमच्यासारखा दुसऱ्यावर अवलंबून राहात नाहीं. आमचें खाणेंहि फार साधें असतें. फक्त वनस्पति. वनस्पति मुबलक मिळण्यास आमच्या देशांत त्रास पडत नाहीं. कारण आमच्या देशांतील कांहीं मुलूख रेताड असला तरी बाकीचा बराच मोठा मुलूख दाट झाडाझुडपांचा आहे.

मी मांसाला शिवतसुद्धां नाहीं. मांस खाणें हा आमचा धर्म नव्हे. इतर पुष्कळजण मांस खातात. मनुष्यप्राणी तर अट्टल मांसाहारी आहे. त्याला माझें मांस फार आवडतें. माझ्या शेपटीचें मांस त्याला मिळालें तर त्याचा आनंद गगनांत मावेनासा होतो. तो आमचें मांस खातो, तरी आम्ही त्याचेवर रागवत नाहीं. उलट आम्ही त्याला आमची त्वचा देतों. आमच्या त्वचेपासून तो सुंदर कातडे कमावतो आणि त्याच्या निरनिराळ्या वस्तू करून आनंदाने वापरतो. त्याचा आनंद पाहून आम्हांला समाधान वाटतें. कारण जगाच्या कल्याणा संताच्या विभूति—

प्रश्न—१. कांगारू कोणत्या देशांत आढळते ? त्यांच्या जाती कोणत्या ? त्यांचे खाणें पिणें काय ?

२. कोणत्या गोष्टींमुळें कांगारू विचित्र दिसते ? कांगरूच्या मादीला विशेष काय असतें ? त्याचा उपयोग ती काय करते ?

३. वाक्यांत उपयोग करा—
स्वतांचे पायावर उभें राहाणें, आनंद गगनांत मावणें.

४. म्हणजे काय ?
देवाची करणी अन् नारळांत पाणी.
जगाच्या कल्याणा······ उपकारे.

---


# ५ लामा व अल्पाका (माहिती)

आतांपर्यंत तुम्हांला बऱ्याच नव्या प्राण्यांची माहिती झाली. आज आणखी एका नवीन व उपयुक्त प्राण्याची ओळख मी तुम्हांला करून देणार आहे. तो प्राणी म्हणजे लामा होय.

लामा हा दक्षिण अमेरिकेचा रहिवासी. जगांतील इतर कोणत्याहि देशांत तो आढळून येत नाहीं. त्यामुळें लामा दक्षिण अमेरिकेंतील विशेष मानला जातो. पण दक्षिणअमेरिकेंत मात्र त्याला यथा तथाच मान आहे. कारण अति तेथें माती, हा न्याय त्यालाहि तेथें लागू पडतो. तेथें कोठेहि रानावनांतून फिरा किंवा डोंगराकंगरांतून उड्या मारा लामाचे कळपचे कळप दिसतील तुम्हाला. त्याच्याशिवाय इतर प्राणी क्वचितच दृष्टीस पडेल तेथें. लामा एकटा सहसा सांपडत नाहीं. तो कळप करून राहातो.

दिसावयास लामा आपल्याकडील उंटाप्रमाणें दिसतो. पण तो जरा उंटापेक्षां लहान असतो. त्याची उंची साधारण चार फुटांपर्यंत असते. त्याला वशिंड नसतें. त्याचे खूर मात्र गाईबैलांच्या खुरांप्रमाणें दुभंगलेले असतात. त्याचे अंगावर लांब लांब केस लोंबत असतात. एकंदरींत लामा उंटासारखा जरी दिसत असला, तरी वशिंडाच्या गैरहजरीमुळें आणि केसांच्या अस्तित्वामुळें तो कसा विचित्र दिसत असेल, याची कल्पनाच केलेली बरी. अगोदरच उंच, दिसण्यांत ओंगळ आणि त्यांत

वशिंडहि नाहीं. उलट अंगावर अस्वलाप्रमाणें केस भरपूर. वशिंडहीन केसाळ लामा तुमच्या डोळ्याला खचित विद्रुप दिसेल.



लामाला जरी उंटाप्रमाणें कुरुप शरीर लाभलें असलें, तरी उंटाचें दुर्दैव मात्र त्याच्या वाट्यास आलें नाहीं. त्याची खाण्यापिण्याची चंगळ असते. रानावनांतून डोंगराकंगरांतून दऱ्याखोऱ्यांतून त्याला काय कमी आहे? तेथील सर्व प्रदेशावर त्याची सत्ता. त्यांतील नदीनाले, गवतकाडी, पानपाचोळा, झाडेंझुडपें त्या सर्वांवर त्याची मालकी. शिवाय स्वतंत्र वातावरण. कोणाची एक नाहीं अन् दोन नाहीं. तो तेथील राजा म्हटलें तरी चालेल.

असें पोषक वातावरण मिळाल्यामुळें लामांची उत्पत्ती दक्षिण अमेरिकेंत मोठ्या प्रमाणांत होते. मादी मुलाचें संगोपन व्यवस्थित करते. ती त्यांना अंगावर दूध पाजते. लामा जोडपें पाळल्यास लामाचा ओझीं वाहण्याकरितां उपयोग होतो. मादीचें दूध निरोगी असतें. त्याचाहि उपयोग माणसांना होतो. शिवाय तिचें मांस खाण्यास रुचकर असतें. दक्षिण अमेरिकन लोकांना त्याची चटक चांगली लागलेली आहे.

लामा कितीहि माणसाळला तरी एकंदरींत तो रानटीच. लामाची दुसरी एक माणसाळलेली जात आहे. तिला 'अल्पाका' म्हणतात.

अल्पाका मूळचा दक्षिण अमेरिकेचा; पण त्याची उपयुक्तता पाहून त्याची वसाहत पेगू व वालेन्हिया येथील लोकांनीं आपापल्या देशांत केली आहे. यावरून मनुष्यप्राणी किती स्वार्थी आहे पाहा ! तो स्वार्थाकरितां स्वजातीय प्राण्यांना दूर लोटतो आणि परजातीय प्राण्यांना जवळ करतो. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, वगैरे देशांतील लोक इतर देशांतील लोकांना आपल्या देशांत सहजासहजीं येऊं देत नाहींत. उलट पेरु आणि वालेन्हियामधील लोक दक्षिण अमेरिकेंतून अल्पाका मोठ्या मिनतवारीनें आपल्या देशांत नेतात. कां तर त्यांचेपासून त्याना लोंकर मिळते. त्या लोकरीपासून सुंदर कापड विणता येतें. आणि शेवटीं या धंद्यांत त्यांना भरमसाट नफा होतो. विलक्षण आहे जगाचा न्याय !

इंग्लंडमध्यें सुद्धां अल्पाका कापड तयार करण्याचे कारखाने आहेत. हे कारखाने येथें सुरू होऊन शंभरावर वर्षें झालीं. पहिला कारखाना सन १८३६ त ब्रेडफर्ड नजीक सॉल्टेअर येथें सर टिटस सॉल्ट या गृहस्थानें काढला. तेव्हांपासून आजपर्यंत अल्पाका कापडाची प्रसिद्धी चोहोंकडे झाली. अल्पाका कापडाचा रंग काळा, तपकिरी किंवा करडा असतो. अल्पाका प्राण्याच्या केसांचे रंगहि वरील रंगाप्रमाणेंच असतात. मूळच्या केसांचा रंग कापडाला असल्यामुळें तें कापड अधिक खुलून दिसतें. तसेंच, केस अगदीं रेशमासारखे मऊ असल्यामुळें अल्पाका कापड अतिशय तलम असतें. या सर्व गुणांमुळें जगांतील सर्व देशांच्या लोकांना तें फार आवडतें. म्हणून इंग्लंडमधून लाखों रुपयांच्या कापडाची निर्यात जगभर होते. आपल्या हिंदुस्थानांतहि तें कापड येतें. तुम्ही पाहिलें आहे कां अल्पाका कापड !

प्रश्न—१. लामा कोणत्या देशाचा ? त्याचा उपयोग काय ?
२. लामा आणि उंट यांच्या शरीररचनेंत फरक काय ? लामा अधिक विद्रूप कां दिसतो ? तो नशिबवान कसा ?

३. अल्पाका मूळचा कोठला ? नंतर त्याची वसाहत कोठें झाली ? कोणीं केली ? कां केली ?

४. अल्पाका कापड लोकांच्या आवडीचें कां ?

५. वाक्यांत उपयोग करा—दुर्दैव वांट्यास येणें. खाण्यापिण्याची चंगळ असणें. अति तेथें माती.

६. लामाचें चित्र काढा.

---

# ६ मी कोण ? (ओळख)

तुम्ही फार अजाण आहांत, अज्ञानी आहांत. ज्ञान घेण्याचें सोंग मात्र चांगलें करतां येतें तुम्हांला. दररोज शाळेला यायचें, मास्तर सांगतील तें पाठ करायचें आणि घरीं जायचें. याशिवाय दुसरा उद्योग नाहीं तुम्हांला. हें खरें ज्ञान नव्हे. पोपटपंची करणें म्हणजे ज्ञान मिळविणें नव्हे. तुमच्यांत चौकसबुद्धि कशी ती नाहीं. तुम्ही दररोज खातांपितां कपडे घालतां, सिनेमा पाहतां, मजा मारतां, पण तुमच्या आयुष्यांतील नित्यापयोगी गोष्टींची माहिती तुम्हांला नसते. तुम्हांला राग येऊं देऊं नका. मी सत्यपरिस्थिति सांगितली. ही परिस्थिति मला प्रसंगानें कळून आली. तो प्रसंग असा कीं, माझ्यासारखा प्राणी दुरापास्त नसतांना आणि तो तुमच्या उपयोगी पडत असतांनासुद्धां माझी ओळख तुम्हांला नाहीं. माझें नांव तुम्हांला माहीत नाहीं. तें माहीत करून घेण्याचा तुम्ही कधीं प्रयत्न केला नाहीं. असो. आज मात्र माझी ओळख मी करून देणार आहे. मात्र एका अटीवर. मी तुम्हांला माझी सर्व सांगण्यास्तों, खुणा सांगतों. तुम्ही फक्त नांव सांगायचें. कबूल ? घ्या. मी जरा कुत्र्यासारखा असून तोंड मांजरासारखें आहे. माझें बाळगतात व दोन फूट आहे. आणि शेपटीं सव्वाफूट लांब आहे.

अल्पाका मूळचा दक्षिण अमेरिकेचा; पण त्याची उपयुक्तता पाहून त्याची त्रसाहत पेगू व बालेव्हिया येथील लोकांनीं आपापल्या देशांत केली आहे. यावरून मनुष्यप्राणी किती स्वार्थी आहे पाहा! तो स्वार्थाकरितां स्वजातीय प्राण्यांना दूर लोटतो आणि परजातीय प्राण्यांना जवळ करतो. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, वगैरे देशांतील लोक इतर देशांतील लोकांना आपल्या देशांत सहजासहजीं येऊं देत नाहींत. उलट पेरु आणि बालेव्हियामधील लोक दक्षिण अमेरिकेंतून अल्पाका मोठ्या मिनतवारीनें आपल्या देशांत नेतात. कां तर त्यांचेपासून त्याना लोंकर मिळते. त्या लोकरीपासून सुंदर कापड विणता येतें. आणि शेवटीं या धंद्यांत त्यांना भरमसाट नफा होतो. विलक्षण आहे जगाचा न्याय!

इंग्लंडमध्यें सुद्धां अल्पाका कापड तयार करण्याचे कारखाने आहेत. हे कारखाने येथें सुरूं होऊन शंभरावर वर्षें झालीं. पहिला कारखाना सन १८३६ त ब्रेडफर्ड नजीक सॉल्टेअर येथें सर टिटस सॉल्ट या गृहस्थानें काढला. तेव्हांपासून आजपर्यंत अल्पाका कापडाची प्रसिद्धी चोहोंकडे झाली. अल्पाका कापडाचा रंग काळा, तपकिरी किंवा करडा असतो. अल्पाका प्राण्याच्या केसांचे रंगहि वरील रंगाप्रमाणेंच असतात. मूळच्या केसांचा रंग कापडाला असल्यामुळें तें कापड अधिक खुलून दिसतें. तसेंच, केस अगदीं रेशमासारखे मऊ असल्यामुळें अल्पाका कापड अतिशय तलम असतें. या सर्व गुणांमुळें जगांतील सर्व देशांच्या लोकांना तें फार आवडतें. म्हणून इंग्लंडमधून लाखों रुपयांच्या कापडाची निर्यात जगभर होते. आपल्या हिंदुस्थानांतहि तें कापड येतें. तुम्ही पाहिलें आहे कां अल्पाका कापड!

प्रश्न—१. लामा कोणत्या देशाचा? त्याचा उपयोग काय?
२. लामा आणि उंट यांच्या शरीररचनेंत फरक काय? लामा अधिक विद्रूप कां दिसतो? तो नशिबवान कसा?

३. अल्पाका मूळचा कोठला ? नंतर त्याची वसाहत कोठें झाली ? कोणीं केली ? कां केली ?
४. अल्पाका कापड लोकांच्या आवडीचें कां ?
५. वाक्यांत उपयोग करा—दुर्दैव वांट्यास येणें. खाण्यापिण्याची चंगळ असणें. अति तेथें माती.
६. लामाचें चित्र काढा.


३०९४ २१

# ६ मी कोण ? (ओळख)

तुम्ही फार अजाण आहांत, अज्ञानी आहांत. ज्ञान घेण्याचें सोंग मात्र चांगलें करतां येतें तुम्हांला. दररोज शाळेला यायचें, मास्तर सांगतील तें पाठ करायचें आणि घरीं जायचें. याशिवाय दुसरा उद्योग नाहीं तुम्हांला. हें खरें ज्ञान नव्हे. पोपटपंची करणें म्हणजे ज्ञान मिळविणें नव्हे. तुमच्यांत चौकसबुद्धि कशी ती नाहीं. तुम्ही दररोज खातांपितां कपडे घालतां, सिनेमा पाहतां, मजा मारतां, पण तुमच्या आयुष्यांतील नित्यपयोगी गोष्टींची माहिती तुम्हांला नसते. तुम्हांला राग येऊं देऊं नका. मी सत्यपरिस्थिति सांगितली. ही परिस्थिति मला प्रसंगानें कळून आली. तो प्रसंग असा कीं, माझ्यासारखा प्राणी दुरापास्त नसतांना आणि तो तुमच्या उपयोगी पडत असतांनासुद्धां माझी ओळख तुम्हांला नाहीं. माझें नांव तुम्हांला माहीत नाहीं. तें माहीत करून घेण्याचा तुम्ही कधीं प्रयत्न केला नाहीं. असो. आज मात्र माझी ओळख तुम्हांला करून देणार आहे. मात्र एका अटीवर. मी तुम्हांला माझी सर्व माहिती सांगतों, खुणा सांगतों. तुम्ही फक्त नांव सांगायचें. कबूल ?

माझा आकार कुत्र्यासारखा असून तोंड मांजरासारखें आहे. माझें एकंदर शरीर सव्वादोन फूट आहे. आणि शेपटी सव्वाफूट लांब आहे.

माझ्या शेपटीची लांबी ऐकून तुम्हांला मारुतीची आठवण झाली असेल. मारुतीची शेपटी खरोखर सांगतात तेवढी मोठी होती कीं नाहीं, हें सांगण्यास आज आपल्याजवळ पुरावा नाहीं. पण मला वाटतें ती तेवढी मोठी नसावी; कारण मारुतीचा वंशज जो वानर त्याची शेपटी तर साधारणच असते. मला अतिशयोक्ति आवडत नाहीं. माझी शेपटी हवी तर मोजा. सव्वाफुटाला इंचभर सुद्धां कमी भरणार नाहीं. मला माझ्या लांबलचक शेपटीचा अभिमान वाटतो.



माझी लांबलचक शेपटी सोडून दिली तर माझे इतर अवयव लहान असतात. मला उंदरासारखे छोटे कान असतात. माझे पाय गोल असून जाळीदार असतात. त्यामुळें मला पोहतां येतें. या जाळीदार पायांच सुद्धां मला गर्व आहे. आपलें खरें बोलणें चांगलें. तुम्हीच सांगा कीं इतर कोणत्याहि प्राण्याला माझ्यासारखे जाळीदार पाय नसतां कां ..., ना मला त्यांच्याबद्दल गर्व कां असूं नये?

माझी मादी दिसावयास माझ्याप्रमाणेंच असते. ती माझ्या मुला-बाळांची काळजी घेते. त्यांना अंगावर पाजते.

थांबा. अधीर होऊं नका. माझें नांव सांगण्याची घाई करूं नका. कारण मला अद्याप पुष्कळ माहिती सांगावयाची आहे. सांगितलेल्या माहितीवरून सांगाल एकाद्या प्राण्याचें नांव आणि मग चुकाल विनाकारण.

मी नदीकाठीं असतों. समुद्रकांठींहि माझी वस्ती असते. नदी कांठाला किंवा समुद्रकांठाला कोठें कोठें खडक असतात. त्या खडकांना कपारी असतात. या कपारींच माझीं घरें. माझ्या जातवांधवांची वस्ती जवळजवळ सर्व जगभर आहे. हिंदुस्थान, युरोप, दक्षिण अमेरिका या देशांच्या समुद्र किनाऱ्यांना माझी वस्ती विशेष आहे. यूरोपमधील नद्यां-मध्येंहि मीं घरें केलीं आहेत. उत्तर अमेरिकेच्या किनाऱ्याला माझे जात-बांधव आहेत. ते माझ्यापेक्षां शरीरानें मोठे आहेत. त्यांच्या अंगावर बारीक केस असतात. ते आमच्यांतले खरे, पण त्यांची एक वेगळीच जात आहे. तुमच्यांत जशा जाती उपजाती असतात, तशीच आमच्यां-तहि त्याची उपजात आहे.

मला एक संवय आहे. मी नेहमीं पाण्यांत समोर उभ्या रेषेंत पोहतों. बाजूला वळून इकडे तिकडे पोहणें मला कठीण पडतें. तुम्हांला रानडुकराची असलीच खोड माहिती असेल. तोहि सरळ समोर पळतो. त्याला माझ्या-सारखेंच बाजूला वळणें कठीण पडतें. या बाबतींत आम्हांला भाऊभाऊ म्हटलें तरी चालेल.

मी मांसाहारी आहे. माझें मुख्य खाणें मासे होय. मी रात्रीं मासे मारतों. एवढ्यावरून तुमची कल्पना झाली असेल कीं, मी एक प्रकारचा मासा आहे म्हणून; कारण मी माशाप्रमाणें पाण्यांत राहातों, पाण्यांत पोहतों आणि माशांना खातों. पण मी मासा नाहीं, हें स्पष्ट सांगून ठेवतों. मी पुन्हां एकदां विनंति करतों कीं माझी माहिती पूर्ण झाल्याशिवाय माझें नांव सांगण्याची अशी घाई करूं नका. आतां करतोच पुरी ती. नीट लक्ष द्या. मी जसे मासे पकडतों, तसे माणसेंहि मला पकडतात. कोळी मला बाळगतात व मासे पकडून किनाऱ्यावर आणून टाकण्यास शिकवतात.

मासे धरून दमल्यावर मला थोडेसें खाण्यास देतात. माझी शिकार करणें धोक्याचें नसलें तरी सोपें खास नाहीं. माझी शिकार करण्याकरितां लोक कुत्रे बाळगतात. या शिकारीचा मोसम एप्रीलपासून सप्टेंबरपर्यंत असतो.

आतां संपली माझी माहिती. सांगा माझें नांव. पूर्ण विचारानें सांगा हो, नाहींतर चुकाल. केलींत तोंडें वांकडीं! मी प्रथमच बजावलें होतें कीं, तुम्ही फार अजाण आहांत, तुम्हांला विचार करण्याची संवय नाहीं. तुम्हांला नाहींच सांगतां येणार. तुमच्या नादी लागण्यांत अर्थ नाहीं. मीच सांगतों आतां, माझें नांव 'ओटर' आहे. तुम्हांला हें नांव नवीन आहे. असेलहि पण तें जाणून घेण्याचा प्रयत्न तुम्ही केला होता कां?

प्रश्न—१. ओटर कोणत्या देशांत सांपडतो? त्याचें घर कोठें व कसें असतें?

२. ओटरला आपल्या कोणत्या अवयवांबद्दल अभिमान वाटतो. कां?


३. ओटरला कोणती संवय आहे? कोणाप्रमाणें?

४. ओटर माशाची शिकार केव्हां करतो? माणसें ओटरची शिकार कशी करतात?

# ७ झेब्रा (माहिती)

तुम्हांला चटयापटयांचा पतंग माहीत आहे. मुलांना इतर पतंगांपेक्षां तो फार आवडतो. तुम्ही चटयापटयाच्या कापडाचे कोट पाहिले असतील. विशेषतः खेळाडू खेळत असतांना ते वापरतात. त्यांच्या त्या कोटाचें बघणारांना एक प्रकारचें आकर्षण वाटतें. अशाच पटयापटयांचा एक प्राणी आहे. त्याची माहिती तुम्हांला मोठी आकर्षक आणि मनोरंजक वाटेल.

कोणतां बरें तो प्राणी ? वाघ ? नाहीं. मुळींच नाहीं. तो पट्या-पट्यांचा प्राणी आपल्या हिंदुस्थानांत नाहीं. तो आफ्रिकेंत आहे. त्याचें नांव झेब्रा.



झेब्र्याचा आकार घोड्यासारखा असतो. त्याच्या सर्व अंगावर काळे पट्टे असतात. त्याच्या डोक्यावर, कपाळावर, पाठीवर, सर्व ठिकाणीं ते असतात. खालीं पोटाच्या भागाला मात्र ते नसतात. पोटाच्या खालील भागाचा रंग करडा असतो.

झेब्रा आकारानें जरी घोड्यासारखा असला तरी पुष्कळशा बाबतींत त्याचें साम्य गाढवाशीं फार आहे. त्याचे कान गाढवाप्रमाणेंच लांब असतात. पण त्यामुळें त्याला ' लंबकर्ण ' ही पदवी मात्र कोणी बहाल केलेली नाहीं. यावरून त्याच्या देशांत त्याची विशेष चहा जरी होत नसली, तरी गाढवासारखा त्याचा उपहासहि होत नाहीं. ही गोष्ट स्पष्ट आहे. गाढवा-प्रमाणेंच झेब्र्याच्या आयाळीचे केस सरळ ताठ उभे असतात. ते खालीं पडलेले नसतात. तसेंच त्याचें शेपूटहि गाढवाच्या शेपटाप्रमाणेंच झुपकेदार असतें एकंदरींत झेब्रा हा गमतीदार प्राणी आहे. आकार घोड्याचा आणि साम्य गाढवाशीं ! छान !

झेब्रा दिसावयास जरी गाढवासारखा असला, तरी त्याचें नशीब गाढवापेक्षां बलवत्तर आहे. गाढवासारखा झेब्रा हा बेवारसी माल नाहीं. ' गरज सरो आणि वैद्य मरो ' अशी जी वागणूक आपल्याकडे गाढवांस मिळते, तशी आफ्रिकेंत झेब्राला मिळत नाहीं. आफ्रिकन लोक झेब्रा हौसेनें पाळतात. तेथें त्यांच्या राहाण्याची खाण्यापिण्याची चांगली सोय लावतात.

झेब्रा हा आफ्रिकेंत अतिशय उपयुक्त असा प्राणी गणला जातो. तो आपल्या मालकाकरितां बरींच कष्टाचीं कामें करतो. आपल्या इकडे घोडा जीं जीं कामें करतो, तीं तीं कामें झेब्रा करूं शकतो. शिवाय बैलांप्रमाणें तो शेतीच्याहि उपयोगी पडतो. अशा कष्टाळू प्राण्यांचा आधार असल्या-शिवाय एकटा मनुष्य काय करूं शकणार ?

प्रश्न—१. झेब्रा हा गमतीदार प्राणी कसा ? त्याचा उपयोग काय ?
२. वाक्यांत उपयोग करा.
लंबकर्ण, गरज सरो आणि वैद्य मरो.

---


# ८ गेंडा ( माहिती )

गेंडा हा प्राणी आफ्रिका, जावा व सुमात्रा या देशांत आढळतो. त्याला दलदलीच्या जागीं राहाणें आवडतें. हिंदुस्थानांत हिमालयाचे पाय-थ्याशीं दलदलीचा प्रदेश आहे, तेथेंहि तो आढळतो. हिंदुस्थानांतील गेंडा इतर देशांतील गेंड्यापेक्षां बराच मोठा असतो.

गेंड्याचें शरीर फार ओबडधोबड असतें. त्याची कातडी फार जाड असते. ह्या कातडीस सुरकुत्या असल्यामुळें त्याला आपलें अंग हलवितां येतें.

गेंड्याचा विशेष अवयव म्हणजे त्याच्या शिंगाची रचना. गेंड्याच्या शिंगांची संख्या ठराविक नाहीं. कांहीं गेंड्यांना एकच शिंग असतें, तर

कांहींना दोन असतात. आणि कांहींना तीनसुद्धां असतात. तिनापेक्षां जास्त शिंगें मात्र नसतात. या बाबतींत गेंडा शंकराची बरोबरी करतो, असें म्हटल्यास चालेल. कारण शंकराला तीन डोळे आहेत. तर याला तीन शिंगें आहेत. सामान्यतः जावा बेटांतील गेंडयास एकच शिंग असतें.



सुमात्रा आणि आफ्रिका खंडांतील गेंडयास दोन शिंगें असतात. क्वचित् तीनहि असतात. त्याच्या शिंगांविषयीं आणखी वैशिष्ट्य म्हणजे, हीं शिंगें त्याच्या नाकावर असून तीं मागील बाजूस झुकलेलीं असतात. तसेंच तीं समोर शेजारी शेजारी नसून एकामागें एक असतात. सर्वांत पुढचें शिंग सर्वांत लांब असतें. त्याची लांबी सुमारें दोन फूट असते. मागच्या शिंगाची लांबी कमी असून तिसरें शिंग सर्वांत आखूड असतें.

शरीराचें मानानें गेंडयाचें डोकें लहान असून त्रिकोणाकृति असतें. त्याची जीभ गुळगुळीत असते. वरचा ओठ लांब असून निमुळता असतो व तो त्याला हलवितां येतो. त्याचे डोळे पण लहान असतात. कान मात्र कांहींसे लांब असतात. हे कानहि त्याला हालवितां येतात. मान लांब असून एखाद्या म्हातारीच्या मानेप्रमाणें ती सुरकुतलेली असते.

गेंड्याचे प्रत्येक पायास तीन खूर असतात. त्याचे पाय फारच आखूड असतात. त्यामुळें त्याचें पोट जमिनीपर्यंत आलेलें असतें. या सर्व गोष्टींमुळें गेंडा दिसावयास अगदीं कुरूप दिसतो.

मनुष्याप्रमाणेंच गेंडयाचें आयुष्य शंभर वर्षांवर आहे. त्याच्या मादीला नऊ महिन्यानंतर मूल होतें. बायाप्रमाणेंच तिला एकेवेळीं एकच मूल होतें. आणि तें तिच्या अंगावर दोन वर्षें पीत असतें.

गेंडा स्वभावानें क्रूर असतो. पण तो स्वत: होऊन कोणाच्या वाटेस जात नाहीं. त्याचें मोठें हत्यार म्हणजे त्याचें शिंग. रस्त्यांत कांहीं आड आल्यास तें दूर करण्यास तो शिंगाचा उपयोग करतो.

गेंडा सहसा माणसाळत नाहीं. परंतु फार प्राचीनकाळीं त्याला दारू पाजून लढाईंत सोडीत असत. वाघ, सिंहाप्रमाणें लोक गेंडयाची शिकार करतात. गेंडयाचें मांस खाण्यास रुचकर लागतें. विशेषत: चिनी लोकांस तें फार आवडतें. तसेंच त्याचें कातडें आणि शिंग यांचाहि उपयोग चांगला होतो. त्याच्या कातडयाच्या ढाली करतां येतात आणि शिंगाच्या निरनिराळ्या प्रकारच्या वस्तू तयार करतां येतात.

प्रश्न—१. कोणत्या गोष्टींमुळें गेंडा दिसावयास कुरूप दिसतो ?
२. गेंड्याचा स्वभाव कसा असतो ? कशावरून ?
३. गेंड्याचा उपयोग काय ?


---

# ९ पाणघोडा ( चित्रवाचन )

गाढवाशीं तुमची चांगली ओळख आहे. घोडा तुम्हांला माहीत आहे. खेचर तुम्हीं पाहिलें असेल, झेब्र्याची माहिती तुम्हांला झाली आहे. पण पाणघोडा तुम्हांला माहित आहे काय ? नाहीं ?

नाहीं तर चला माझ्याबरोबर, आफ्रिका खंडांत. तेथें हवेतितके पाणघोडे सांपडतील; सरोवरांत किंवा नदींत पोहतांना. पाणघोड्यांना

चांगलें पोहतां येतें. एवढेंच नव्हे तर बुडी मारून त्यांना पाण्यांत पांच-पांच सहासहा मिनिटें दम छाटून राहातां येतें. म्हणून तर त्यांना पाणघोडे म्हणतात.



ते पाहा. ते पाणघोडे नदींत पोहत आहेत. एक पाणघोडातर कांठावर उभा आहे. केवढा अगडबंब प्राणी आहे तो ! अगदीं हत्ती-सारखाच मोठा आणि अवजड दिसतो तो. दहापंधरा फूट तरी त्याची लांबी सहज येईल. रंगानें मात्र तो काळसर तपकिरी येईल. बाकी त्याची कातडी, पाय व शरीराची ढब अगदीं गेंड्यासारखी दिसते. त्याचें तोंड कसें सुजल्यासारखें दिसतें, जेसें कांहीं कोणी मारलंय. पण त्याला कोणीं मारलें नाहीं आणि कांहीं नाहीं. त्याचें तोंडच मुळीं असें असतें. शिवाय त्याचें डोकेंपण जड असतें. अन् त्याचा जबडा केवढा मोठा आणि लांबलचक ! अगदीं डोळ्यांपर्यंत भिडलाय तो. त्यामुळें डोळ्यांचा जणूं पत्ता आहे कीं नाहीं, असेंच झालें आहे. अगोदरच डोळे लहान आणि त्यांत त्या जबड्याची जबरदस्ती. नाकपण लहानच आहे. कान चिंचाळे असून त्यावर आखूड व मऊ केस आहेत. शेपूटहि

व्हानच आहे. पायास चारचार खूर आहेत. गेंडयाप्रमाणें याचे नाका-वर शिंगें नसलीं, तरी दिसण्यांत त्याच्यासारखाच कुरूप आहे.

पाणघोडे कळप करून राहतात. त्यांचें खाणेंपिणें घोडयाप्रमाणेंच गवतकाडी आणि रानांतील झाडपाला असें असतें.

पाणघोडे निरुपद्रवी असतात. त्यांना कोणी त्रास दिला तर मात्र ते चिडतात. पाणघोडयाचीहि शिकार करतात. त्यांच्या दांतांचा उपयोग हस्तिदंताप्रमाणें होतो. कातडयाच्या ढाली करतात. पाणघोडा चिडखोर असला तरी उपयुक्त फार आहे.

प्रश्न—१. पाणघोडयाची घोडयाबरोबर तुलना करा.


२. चिडल्यानंतर मनुष्याला त्रास देणाऱ्या तीन निरुपद्रवी प्राण्यांचीं नांवें सांगा.

---

# १० कस्तुरी मृग ( माहिती )

केशर, कस्तुरी हीं नांवें तुम्हीं ऐकलीं असतील. हीं नांवें इतकीं लोकप्रिय आहेत कीं, ती वस्तूंचीं नांवें असून सुद्धां तीं मुलींचीं नांवें ठेवलीं आहेत. तुमच्यांपैकीं कांहींनीं तीं पाहिलीं असतील. पण बऱ्याच जणांना तीं पाहावयास मिळालीं नसतील. त्याचें कारण तीं मौल्यवान आहेत. केशराच्या बारीक काडया असतात. तो पिवळा असतो, सुगंधी असतो, म्हणून मेवामिठाईमध्यें वेलदोडयाप्रमाणें घालतात. तो काश्मीरमध्यें होतो. पण उत्कृष्ट केशर पॅरीसमधील गणला जातो. केशरापेक्षांहि दुर्मीळ व अधिक मौल्यवान् कस्तुरी असते. ती काळी असते. तिचे मोहरीसारखे बारीक दाणे असतात. तिचा वास अतिशय उग्र असतो. ती फारच उष्ण असते. म्हणून तिचा विशेषेंकरून औषधाचे कामीं उपयोग करतात. कस्तुरी हरणाच्या पोटांत सांपडते. हें वाचून तुम्हाला आश्चर्य वाटेल. पण

सर्व हरणांच्या पोटांत कांहीं कस्तुरी सांपडत नाहीं. एका विशिष्ट प्रकार-च्या हरणाच्या जातीमध्यें ती असते. त्या हरणास कस्तुरी मृग म्हणतात. कस्तुरी मृग कोठें असतो, कसा असतो, काय खातो, वगैरे जाणण्यास तुम्ही उत्सुक झाला असाल, होय ना ? कस्तुरी मृग मध्य आशियांतील राहाणारा. मध्य आशियामध्यें जो डोंगराळ भाग आहे, तेथें यांची वस्ती आहे. हा तिबेटांत व हिमालयांत उंच भागींहि आढळतो. त्याचें खाणें-पिणें साध्या हरणाच्या खाण्यापिण्याप्रमाणेंच असतें. जंगलांतील गवत-काडी आणि झाडपाला तो खातो. त्याची दिनचर्या म्हणजे दिवसभर खाणेंपिणें अन् चोहोंकडे टण्टण् उडया मारणें.



साधा हरण व कस्तुरी मृग यांमध्यें जमीन अस्मानाचा फरक असतो. कस्तुरी मृगाची उंची सारी वीस इंच असते. म्हणजे साधारणपणें तो बुटकाच असतो. त्याचे अंगावर जाड व राठ केस असतात. हे केस आपल्या केसांइतके चिवट नसतात. या केसांचा रंग करडा-पांढरा

असतो. पुढच्या पायांपेक्षां त्याचे मागचे पाय फारच लांब असतात. त्याचे खूर रुंद व सपाट असून बाहेर कललेले असतात. नरास किंवा मादीस शिंगें नसतात. एकंदरींत त्याचें शरीर बेढब असतें. असें म्हणावयास हरकत नाहीं. त्याच्या बेडौल आकारांत आणखी एका विचित्र अवयवाची भर पडली आहे. तो अवयव म्हणजे वरच्या जबडयांतील सुळे. हे सुळे तीन इंच लांब असतात. ते तरवारीच्या पात्याप्रमाणें वांकडे असून त्यांचीं टोकें खालच्या बाजूस बाहेर उतरलेलीं असतात. त्यामुळें त्याला हरणांतील राक्षसाचें स्वरूप आलें आहे.

बाह्य शरीररचनेपेक्षांहि त्याची अंतर शरीररचना विशेष आश्चर्यकारक आहे. त्याच्या पोटांत बेंबीजवळ एक पिशवी असते. ही पिशवी फक्त नराच्या पोटांत असते. मादीच्या पोटांत नसते. याच पिशवींत कस्तुरी असते. मृग मारल्यानंतर ही पिशवी त्याच्या पोटांतून काढून घेतात. पिशवींत. साधारण काळसर चिवट पदार्थ असतो. तो काढून घेऊन, त्याच्या बारीक बारीक वड्या पाडतात. किंवा लहान लहान गोळ्या बनवतात. वडया आणि गोळ्या सुकल्यानंतर त्यांनाच कस्तुरी म्हणतात.

हरणासारख्या साध्या प्राण्याच्या हवालीं गुप्तपणें कस्तुरीसारखा मौल्यवान् पदार्थ परमेश्वरानें करावा, ही गोष्ट पाहून अचंबा वाटतो. अशा कितीतरी गोष्टी असतील, कीं त्यांचा शोध मनुष्यास अद्याप लागलेला नसेल. परमेश्वराची लीला अगाध आहे !


प्रश्न—१. केशर आणि कस्तुरी कोठें होतात ? त्यांचा उपयोग काय ? दोघांत अधिक मौल्यवान कोण ?

२. कस्तुरी मृगाची साध्या हरणाशीं तुलना करा.

३. कस्तुरी कोठें सांपडते ? ती कशी काढतात ?

# ११ मी कोण ? ( ओळख )

मी कोण ? दिसत नाहीं कां तुम्हांला, मी कोण आहे तो ? चांगला तुमच्यासमोर आहे म्हणून बरें आहे. नाहीं तरी तुम्ही पाहून आंधळे आणि ऐकून बहिरे असेच दिसतां मला. अहो, असे बुचकळ्यांत काय पडलांत ? अजून ओळखलें कीं नाहीं मला ? सांगा तर मग तुम्हीच, मी कोण तो. काय म्हणतां मला ? सरडा; आतां मात्र कमाल झाली बुवा



तुमच्या शहाणपणाची ! अहो, मी सरड्यासारखा दिसतो खरा वर वर बघणारांना. पण जरा न्याहाळून पाहा मला म्हणजे दिसेल सरड्यांत आणि माझ्यांत काय फरक आहे तें. सरड्याप्रमाणें माझी लांबी सहा इंच आहे, हें मी नाकबूल करीत नाहीं. त्याच्याप्रमाणेंच माझा रंग आहे, हेंहि कबूल. पण त्याच्याप्रमाणें माझे रंग बदलत नाहींत. आपले रंग बदलून जगाची दिशाभूल करणें मला नाहीं आवडत. मला याबद्दल तुम्ही कदाचित् दोष द्याल. कारण तुम्हांलाहि आहे संवय, वेळ येईल तशी पगडी फिरवावयाची. ' म्हणें माझी त्यावेळीं फसवणूक झाली होती, म्हणून मी अमक्या पक्षांस सामील झालों होतों. आतां मला चांगली समज मिळाली. माझी चुकीची बाजू कळली. म्हणून मी अमका पक्ष सोडला आणि

तमच्या पक्षांस मिळालों.' लोण्याच्या गोळ्यावर लक्ष ठेवल्यामुळें सतत बदलणारीं तुमचीं मतें. तुम्हांस नाहीं पटावयाचा माझा स्वभाव. तसेंच तुमच्या सरड्याप्रमाणें मला लोकांच्या डोळ्यांत धुळफेकहि करतां येत नाहीं. सरड्यानें एकदां का फुंकर मारली, कीं झालाच तुम्ही आंधळे. असला विश्वासघातकी विचारी मी नाहीं. मी आपला सरळ, साधाभोळा, अगदीं नाकासमोर चालणारा, पण जगांत सरळांना ओळखतो कोण? त्यांची टिंगलच व्हायची.

काय? टिंगल नाहीं करीत? तुम्ही खरोखरीच मला ओळखलें नाहीं म्हणतां? असेलहि तसें. पण मी म्हणतों तुम्ही मला खुशाल सरडा म्हणतां तें कसें? तुम्ही सरडा हजारदां पाहिला असेल. मलाहि आतां पाहात आहांत. त्याच्यांत आणि माझ्यांत कांहीं फरक दिसत नाहीं तुम्हांला? मघा सांगितलेले त्याच्या माझ्या रंगांतील किंवा स्वभावांतील नाजूक फरक नसतील उमगले तुम्हांला. पण कायहो, तुम्ही सरड्याचे पंजे कधीं बघितले नाहींत वाटतें? किती असतात ते? चार ना! आणि बोटें किती असतात प्रत्येक पंजाला? पांच. बरोबर. हे माझे पंजे पाहा आतां. मला पांच पंजे असून प्रत्येक पंजाला फक्त चार बोटें आहेत. हा एक ठळक फरक झाला. दुसरा फरक असा, कीं सरडा राहातो झाडावर आणि मी राहातों अग्नींत; अं! असें आश्चर्यानें तोंडांत बोटें कां घातलींत? अग्नींत राहाणें शक्य वाटत नाहीं तुम्हांला? कां नाहीं? अग्नी तुम्हांला जाळीत असेल, मला नाहीं. जगांत शेराला सव्वाशेर कोणीतरी भेटतोच. तसेंच नियमाला अपवादहि असतोच. आणि असें पाहा, तुम्ही पाण्यांत जगूं शकाल कां? नाहींना? मग मासा जगतोच कीं नाहीं? तसेंच माझें.

एवढे फरक सांगूनहि नाहीं ओळखतां येत मला? बरें; सोडून द्या माझी आणि सरड्याची तुलना. मी माझीच कांहीं माहिती सांगतों. त्या वरून ओळखतां येत असेल तर पाहा. ऐका, मी यूरोपमध्यें राहातों. पश्चिम आशियामध्येंहि माझी वस्ती आहे. मला मांस खाणें फार आवडतें

मी स्वभावानें बराच भित्रा आहें मी भ्यालों म्हणजे माझ्या त्वचेवाटें एक पांढरा द्रव पदार्थ बाहेर टाकतों. तो अतिशय विषारी असतो. हें ऐकलेंत ना तुम्ही ? मग आतां सांगा पाहूं मी कोण तो ?

अजून नाहीं ओळखतां येत मी तुम्हांला ? तुम्ही नाहींच ओळखायचे मला. बरें तर, नका ओळखूं मला. माझ्या बायकोला तर ओळखाल ? तिला खास ओळखाल. कारण आज काल जगांत बायकांना फार भाव आहे. कांहीं हरकत नाहीं, तिला ओळखलें तरी मला ओळखल्यासारखेंच आहे. पण तिचीहि थोडी माहिती अगोदर तुम्हांस द्यावयास पाहिजे. होय ना ? ऐका तर मग. माझ्या मादीला वसंत ऋतुमध्यें मुलें होतात. तिला एकेवेळीं दोन मुलें होतात. तुमच्यापैकीं एकाद्याला जशीं जुळीं होतात तशीं.

काय म्हणालांत ? कोकिळा आणि कोकिळ ? मी कोकीळ आणि ती कोकिळा ? मूर्ख आहांत तुम्ही. वसंत ऋतु शब्द ऐकला, कीं लागलांत कांहीं तरी बरळायला. तुम्हांला कितीहि खुणा सांगितल्या. तरी पालथ्या घड्यावर पाणी. उलट चौफेर फिरतां एकाद्या पिसाटलेल्या घोड्यासारखे त्यामुळें. तेव्हां मीच सांगतों माझें नांव. मला इंग्रजींत सलॅमँडर म्हणतात. मराठींत मला तुम्ही काय म्हणाल ?

प्रश्न—१. सलॅमँडर कोठचा ? तो कोठें राहातो ? काय खातो ?
तो भ्याला हें कशावरून ओळखावें ?
२. सलॅमँडर आणि सरडा यांच्यांत फरक काय ?
३. वाक्यांत उपयोग करा—
पगडी फिरविणें. दिशाभूल करणें. डोळ्यांत धूळ फेकणें. नाकासमोर चालणें. तोंडांत बोट घालणें. शेराला सव्वाशेर असणें. नियमाला अपवाद असणें. पाहून आंधळा आणि ऐकून बहिरा.

२८१७४८

प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरितां
पुरवणीवाचनासाठीं मुद्दाम तयार केलेलीं पुस्तकें

# बालनाटिका

**छापून तयार**

| | |
|---|---|
| इयत्ता पहिली | इयत्ता दुसरी |
| इयत्ता तिसरी | इयत्ता चौथी |

★

लेखिका
**सरोजिनी बाबर, बी. ए. (ऑनर्स)**

पुस्तकांची भाषा मुलांच्या बालमनाचें आकर्षण करणारी असून विषय मनोरंजक निवडले आहेत. पुस्तकाचें बाह्यांग व अंतरंग सुंदर व उपयुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदरीनें पुस्तकें सर्वांगसुंदर अशीं झालीं आहेत. सदर पुस्तकांचा मुलांच्या पुरवणी-वाचनासाठीं उपयोग वर्गांतून करावा. अशी शिफारस अनेक शिक्षणतज्ज्ञ लोकांनीं केलेली आहे. तरी शिक्षकांनीं व विद्यार्थ्यांनीं या पुस्तकाचा उपयोग घ्यावा अशी विनंती आहे.

मेसर्स जोशी आणि लोखंडे, पुणें २.

नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें तयार केलेलीं पुस्तकें

बालवर्ग
किंमत सहा आणे

# बालगाणीं

इयत्ता पहिली
किंमत सहा आणे

( मुलांसाठीं नवीं गाणीं )

संपादक

**शं. रा. देवळे**

शिक्षक, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचें मुलांचें हायस्कूल, पुणें २.

प्रा. **ग. ह. पाटील**, बी.ए., बी.टी. यांची प्रस्तावना.

प्रा. **मायदेव**, श्री. **गोपीनाथ तळवलकर**, प्रा. **ग. ह. पाटील**,
प्रा. **वि. म. कुलकर्णी**, **शांता शेळके**, प्रा. **भ. श्री. पंडित**

इत्यादि कवींचीं पंधरा पंधरा निवडक बालगीतें, अभिनयगीतें, लोकगीतें.

**खूप खूप चित्रें : मोठा टाईप : दोन रंगी मुखपृष्ठ : आकर्षक छपाई**

नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें तयार केलेलीं पुस्तकें

भाग पहिला
किंमत सहा आणे

# बालगोष्टी

भाग दुसरा
किंमत सहा आणे

लेखक

**शं. रा. देवळे आणि रं. म. जोशी**

खूप खूप चित्रें.
दोन रंगीं आकर्षक मुखपृष्ठें.
मोठ्या टाइपांतील रेखीव छपाई.
शिक्षणतज्ज्ञांचे उत्तम अभिप्राय.
विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यासारखीं.
पुरवणीवाचन म्हणून वापरण्यास उपयुक्त.
विद्यार्थ्यांना वाचायला या गोष्टी फार आवडतील.
शिक्षकांना मुलांना सांगण्यासाठीं नव्या गोष्टी यांत मिळतील.

पत्ता:—**मेसर्स जोशी आणि लोखंडे**, ३२५ शनिवार पुणें २.

## आबालवृद्धांकरितां वाचनीय पुस्तकें

# हिंदूधर्माचीं मूलतत्त्वें

# हिंदूधर्माचीं नीतितत्त्वें

# हिंदूधर्मांतील आचार व विधि

लेखक

**कृष्णराव भाऊराव बावर**

हिंदूलोकांमध्यें सध्यां बरीच जागृति झालेली दिसते. धर्माचा अभिमानही चांगला निर्माण होत आहे, पण हिंदूधर्माचें स्वरूप फार व्यापक असल्यानें त्याची थोडक्यांत व निश्चितपणानें माहिती फार थोड्यांना झालेली असते. ही अशा प्रकारची माहिती देण्यासाठीं हीं पुस्तकें तयार केलीं आहेत.

---

# जुन्याकाळच्या नव्या गोष्टी

लेखक

**कृष्णराव भाऊराव बावर**

पुराणकालापासून हिंदू लोकांमध्यें प्रचलित असलेल्या पुष्कळ गोष्टी रूपकात्मक आहेत, त्याच्यावर नवा प्रकाश पाडून त्या पाहिल्या म्हणजे आपला इतिहास चांगल्या प्रकारें कळतो आणि पुष्कळ प्रसंगीं मनाला कोड्यासारखे वाटणारे प्रश्नही चांगल्या प्रकारें सुटतात. ह्या पुस्तकांत अशा गोष्टी नव्या स्वरूपांत दिलेल्या आहेत. ह्या गोष्टी वाचून समाधान झाल्याशिवाय राहाणार नाहीं, अशी आमची खात्री आहे.

**प्रकाशकः—मेसर्स जोशी आणि लोखंडे, पुणें.**

BVBK-0403014